Estd. 1962
'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

२८/२०२३

**विषय - 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' अंतर्गत 'हर घर झंडा' उपक्रम राबविण्याबाबत**

**संदर्भ - १. भारत सरकार, संस्कृति मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. D.O NO. Misc / Secy (C) / २०२३, दिनांक ३१ जुलै २०२३.**

**२. राज्य संपर्क अधिकारी यांचे पत्र क्रं. रासेयो / २०२२ / प्रक्र.२८ / साशि-७, दि.११ ऑगस्ट, २०२३.**

सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक व विद्यापीठातील विद्यार्थी / विद्यार्थीनी आणि सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्थेमधील मा.प्राचार्य / संचालक, शिक्षक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थी / विद्यार्थीनी यांना कळविण्यात येते की, **'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव'** अंतर्गत यावर्षीही दि. १३ ऑगस्ट, २०२३ ते दि.१५ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत **'हर घर झंडा'** या उपक्रमाची यशस्वी अंमलबजावणी करणेसंदर्भात उपरोक्त संदर्भीय पत्रांनुसार कळविण्यात आलेले आहे.

या कालावधीत राज्यातील प्रत्येक नागरिकांच्या घरावर तसेच, सर्व शासकीय, निमशासकीय, खाजगी आस्थापना व सहकारी संस्था यांच्या कार्यालयावर राष्ट्रध्वजाची उभारणी करावी आणि तिरंगा सोबत सेल्फी काढून तो **www.harghartiranga.com** यावर अपलोड करावा. **'हर घर तिरंगा'** हा उपक्रम राबविताना भारतीय ध्वजसंहितेचे तंतोतंत पालन होणे आवश्यक असून, जाणते - अजाणतेपणे राष्ट्रध्वजाचा अवमान होऊ नये याची सर्वांनी दक्षता घ्यावी. याअनुषंगाने सर्व संबंतधितांनी आपल्या स्तरावर विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये सदर उपक्रमाची व्यापक प्रमाणात जनजागृती करावी.

**प्र.कुलसचिव**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**जा.क्र. आस्थापना/** १४४२

**दि.** 12 AUG 2023

**प्रति,**

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक
२) मा.प्राचार्य /संचालक सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.
३) विभाग प्रमुख - सुरक्षा विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
४) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.
- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

**प्रत:- माहितीस्तव**

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.

- **विभागप्रमुख व प्राचार्य/संचालक यांनी सदरचे परिपत्रक शिक्षक व सर्व प्रशासकीय अधिकारी/सेवक व विद्यार्थी/विद्यार्थीनीच्यां निदर्शनास आणावे.**